# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** नागपूर महानगरपालिकेचे सन 2022-2023 चे वार्षिक लेखे स्थायी समिती समोर मंजूरीकरिता ठेवण्याचा प्रश्न विचारात घेणे.

**{वित्त विभाग}**

टिप :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 105 व 106 अंतर्गत तरतुदी नुसार महानगरपालिकेचे वार्षिक लेखे दरवर्षी तयार करुन स्थायी समितीस सादर करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने नागपूर महानगरपालिकेचे तयार करण्यात आलेले सन 2022-2023 चे वार्षिक लेखे "मुख्य लेखापरिक्षक" यांचेकडून तपासणी करुन आलेले आहे. तरी वार्षिक लेखे स्थायी समिती समोर मंजूरीस्तव सादर करण्यात येत आहे.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :-** 925/**स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :-** 16/07/2024

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार प्रमुख लेखा व वित्त अधिकारी, लेखा व वित्त विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिकेचे सन 2022-2023 चे वार्षिक लेखे स्थायी समिती समोर मंजूरीकरिता ठेवण्यात आलेल्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**डॉ. अभिजीत चौधरी (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**